**[२०२३] २ एस. सी. आर. २९३**

**बी. व्ही. सेशयाह**

**वि.**

**तेलंगणा राज्य आणि  अन्य.**

**( फौजदारी अपील क्रमांक २८४/२०२३)**

**१ फेब्रुवारी २०२३**

**[ न्यायमूर्ती कृष्णा मुरारी आणि  न्यायमूर्ती व्ही. रामसुब्रमणियन,]**

परक्रम्य लिखित  कायदा, १८८१ कलम  १३८ -अपीलकर्त्यांची  दोषसिद्धी-उच्च न्यायालयासमोर दाखल केलेले पुनरीक्षण-दरम्यान, पक्षकारांनी वाद मिटवण्यासाठी सामंजस्य ज्ञापन केला, त्याच्या संदर्भात जाबदार क्रमांक २  उच्च न्यायालयासमोर तडजोड याचिका दाखल करण्यास बांधील होता, तथापि तो तसे करण्यात अयशस्वी ठरला-पुनरीक्षण उच्च न्यायालयाने फेटाळले, अपीलकर्त्यांच्या दोषसिद्धीची पुष्टी झाली-अपील केल्यावर असे म्हटलेःहे एक अतिशय स्पष्ट प्रकरण आहे. पक्षकार हे स्वत:ला खटल्याच्या प्रक्रियेपासून वाचवण्यासाठी करारात प्रवेश करणाऱ्या आणि आपसात  तडजोड करणाऱ्या  पक्षांनी कधी असे पाऊल उचलले होते आणि कायदा स्पष्टपणे परवानगी देतो त्यांनी तेच करावे, उच्च न्यायालय अशी तडजोड अधिभावी करू शकत नाही आणि त्याची इच्छा लादु शकत नाही - तसेच, जाबदार  क्रमांक २ हे उच्च न्यायालयासमोर तडजोड याचिका दाखल करण्यास कर्तव्याने बांधील होते आणि तसे नाही केल्याने उच्च

न्यायालयाने महत्त्वाची माहिती काढून घेतली आहे. ज्यामुळे अपीलकर्त्यांच्या शिक्षेची अवाजवी पुष्टी झाली - दोषी ठरविण्याचा आदेश रद्द केला - पक्षकारांना सामंजस्य करारानुसार त्यांचे वादाचे निराकरण करण्यासाठी खुले असेल.

फौजदारी अपील अधिकरक्षेत्र: फौजदारी अपील क्रमांक २८४ /२०२३

उच्च न्यायालय हैदराबाद, तेलंगणा राज्य आणि आंध्रप्रदेश राज्य, यांच्या दिनांक १७. ४. २०१८ च्या निकाल व आदेशातून सी. आर. एल. आर क्रमांक - १६७८ / २०१४.

सोबत.

विशेष परवानगी याचिका (फौजदारी ) क्रमांक - ७१००/२०१८

एम. रामबाबू, मिस प्रिती कुमारी, एन. ईश्वरा राव एम . एम / एस रामबाबू आणि कंपनी, अपीलकर्त्यासाठी वकील . एस. उदय कुमार सागर, लक्ष सैनी, जाबदार साठी वकील .

एन. व्ही. सुब्बा राव, वैयक्तिक जाबदार.

न्यायालयाचा निर्णय न्यायमूर्ती कृष्णा मुरारी, यांनी दिला

१ . परवानगी मंजूर

२. सदरचे अपील हे फौजदारी पुनरीक्षण प्रकरण क्र. १६७८ /२०१४ आणि १६७९/२०१४ मध्ये हैदराबाद येथील उच्च न्यायालयाने पारित केलेल्या दिनांक १७.०४.२०१८ च्या निर्णयाच्या विरोधात अपीलकर्त्यांनी सध्याचे अपील दाखल केले आहेत.

३ . या अपीलांच्या उद्देशाने, थोडक्यात, सध्याच्या खटल्याची तथ्ये अशी आहेत की, जाबदार क्रमांक २ ने सुरू केलेल्या खाजगी तक्रारीवर, परक्रम्य लिखित कायदा, १८८१

च्या कलम १३८ अंतर्गत अपीलकर्त्यांविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यात आली होती. या कार्यवाहीमुळे खटल्याच्या न्यायालयाने अपीलकर्त्यांना दोषी ठरवले.

४ . असा आरोप आहे की, अपीलकर्त्यांनी गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने जाबदार क्रमांक २ कडून पैसे घेतले आणि त्यांच्या फायद्यासाठी अन्याय्य लाभ कमावला.

५ . अपीलकर्त्यांना दोषी ठरवल्यानंतर, त्यांनी उच्च न्यायालयात पुनरीक्षण दाखल केले. ही नोंद घेणे महत्वाचे आहे की, अपीलकर्त्यांनी दाखल केलेल्या पुनरीक्षणादरम्यान, पक्षकारांनी आपापसात वाद मिटवण्यासाठी सामंजस्य करार केला. ६ . सामंजस्य कराराच्या कलम ८ मध्ये असे म्हटले आहे की, हा वाद सलोख्याच्या समजुतीने निकाली काढायचा आहे आणि वाद अद्याप सलोख्याच्या समजुतीने निकाली न निघाल्यास, तो प्रथम एकमेव लवादाकडे पाठवला जाणे आवश्यक आहे. उक्त सामंजस्य ज्ञापनमधील कलम 8 खालीलप्रमाणे आहेः-

> "या दस्तऐवजाअंतर्गत कोणताही वाद सलोख्याच्या समजुतीने सोडवला जाईल. जर वाद सलोख्याच्या समजुतीने सोडवला गेला नाही, तर हे प्रकरण श्री जोन्नलगड्डा श्रीनिवास राव पुत्र व्यंकय्या यां एकमेव लवादाकडे पाठवले जाईल, ज्याचा निर्णय अंतिम असेल आणि सर्व पक्षांसाठी बंधनकारक असेल. संदर्भ प्रविष्ट केल्यावर, एकमेव लवाद पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेईल आणि निर्णय देईल. लवाद आणि तडजोड कायद्याच्या तरतुदी लवादाच्या कार्यवाहीला लागू होतील. लवादाचे ठिकाण केवळ ओंगोल असेल".

७. हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की कराराच्या अटींनुसार, जाबदार क्रमांक २ हे उच्च न्यायालयासमोर तडजोड याचिका दाखल करण्यास बांधील होता, मात्र तो तसे करण्यात अयशस्वी ठरला

८ . आमच्या मते, पक्षांनी केलेल्या तडजोडीच्या अटी आणि शर्ती त्यांना सामंजस्य कराराच्या कलम ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सलोख्याची तडजोड किंवा लवादाद्वारे वाद मिटवण्यास बांधील करतात.

९ . अशा परिस्थितीत, अपीलकर्त्यांना खालील न्यायालयांनी दिलेल्या आदेशांच्या आधारे दोषी ठरवले जाऊ शकत नाही, कारण समझोता हा दुसरे काही नसून तो अपापसात गुन्हा मिटवणे असे आहे.

१० . मेसर्स मीटर अँड इन्स्ट्रुमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि ए. एन. आर. च्या बाबतीत. विरुद्ध कांचन मेहता , या न्यायालयाने असे म्हटले आहे की पारक्रम्या लिखित कायद्याच्या कलम १३८ अंतर्गत गुन्ह्याचे स्वरूप प्रामुख्याने दिवाणी स्वरूपाची अपकृतीशी संबंधित आहे आणि त्याला विशेषतः मिटवण्याजोगा गुन्हा बनवण्यात आले आहे.

> "या न्यायालयाने नोंदवले आहे की या कायद्याचा उद्देश व्यावसायिक व्यवहार सुरळीत पार पाडणे हा होता.ही तरतूद आवश्यक आहे कारण अनेक व्यवहारांमध्ये धनादेश केवळ कर्जदारांची फसवणूक करण्यासाठी एक साधन म्हणून जारी केले जात असत.धनादेशाच्या अनादरामुळे बँकिंग, सार्वजनिक वित्तीय संस्था आणि पारक्रम्या लिखित कायदे (दुरुस्ती) कायदा, १९८८ नुसार न मोजता येण्याजोगा तोटा, नुकसान आणि गैरसोय होते आणि व्यावसायिक व्यवहारांच्या विश्वासार्हतेस धक्का बसतो.त्याच वेळी, हे देखील नोंदवले गेले की

कलम १३८ अंतर्गत गुन्ह्याचे स्वरूप प्रामुख्याने दिवाणी स्वरूपाची अपकृतीशी संबंधित आहे आणि २००२ च्या दुरुस्तीने विशेषतः ते मिटवण्याजोगे केले आहे."

११ . हे एक अतिशय स्पष्ट प्रकरण आहे. पक्षकारांनी स्वत:ला खटल्याच्या प्रक्रियेपासून वाचवण्यासाठी आणि गुन्ह्या मिटणव्यासाठी करार केला आहे जेव्हा पक्षकारांनी असे पाऊल उचलले असते आणि कायदा त्यांना तसे करण्याची अगदी स्पष्टपणे परवानगी देतो, तेव्हा उच्च न्यायालय अशा तडजोडीला अधिभावी करू शकत नाही आणि आपली इच्छा लादू शकत नाही

१२ . हे देखील लक्षात घेतले पाहिजे की उच्च न्यायालयासमोर तडजोड याचिका दाखल करणे हे जाबदार क्रमांक २ चे कर्तव्य होते आणि तसे त्याने न केल्याने उच्च न्यायालयातून महत्त्वाची माहिती मागे घेतली आहे, ज्यामुळे अपीलकर्त्यांच्या दोषसिद्धीची विनाकारण पुष्टी झाली आहे.

१३ . त्यामुळे आम्ही या अपीलांना परवानगी देतो आणि खालील कोर्टाने दिलेला दोषसिद्धीचा आदेश रद्द करत आहे .तथापि, सामंजस्य ज्ञापन अटींनुसार पक्षांना त्यांचा वाद मिटवण्यासाठी खुले ठेवले जाते.

दिव्या पांडे

**अपील मंजूर करण्यात येते.**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.